राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर/धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील अपूर्ण विहीरी पूर्ण करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक- योजना-२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५
१६ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक- ७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-

शासन निर्णय क्रमांकः योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २३ जानेवारी, २०१४.
शासन निर्णय क्रमांक: योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक ०२ जुलै, २०१४.
शासन निर्णय क्रमांक: योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २३ जानेवारी, २०१४
शासन निर्णय क्रमांकः योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २२ डिसेंबर, २०१४.
शासन निर्णय क्रमांकः योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २९ जुलै, २०१५.
शासन निर्णय क्रमांक: योजना -२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५.
शासन निर्णय क्रमांक: योजना -२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५,
दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६.

प्रस्तावना

राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यातील २७ जिल्ह्यामध्ये जवाहर सिंचन विहिर कार्यक्रम व विदर्भातील ६ जिल्ह्यांमध्ये धडक सिंचन विहिर कार्यक्रम घेण्यात येत आहे. या अंतर्गत सन २००६-०७ ते २००८-०९ या कालावधीत जवाहर सिंचन विहिर योजनेसाठी व धडक सिंचन धडक विहिर कार्यक्रमाअंतर्गत विहिरीचा लक्षांक देण्यात आला होता. धडक सिंचन विहिर कार्यक्रमाअंतर्गत धडक सिंचन विहिर व धडक सिंचन विहिर मधून नरेगात वर्ग केलेल्या विहिरींचा समावेश आहे. धडक सिंचन विहिर योजनेतील रद्द केलेल्या विहिरींपैकी ज्या विहिरी परत सुरू करता येणे शक्य आहे अशा विहिरी पुन्हा धडक सिंचन योजनेत सुरू करुन पूर्ण करण्याचा वाचा येथे अ.क्र. ६ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये घेण्यात आला. त्याचप्रमाणे धडक सिंचन विहिर योजनेतून नरेगामध्ये वर्ग करण्यात आलेल्या विहिरींपैकी अपूर्ण असलेल्या विहिरी दिनांक ३०.०४.२०१६ पर्यंत नरेगा अंतर्गत विशेष मोहिम स्वरुपात पूर्ण करावयाच्या होत्या व त्यानंतर ज्या विहिरी नरेगा अंतर्गत पूर्ण होऊ शकणार नाहीत अशा विहिरी दिनांक ३०.०४.२०१६ नंतर परत धडक सिंचन विहिर योजनेत घेऊन पूर्ण करावयाचा निर्णय घेण्यात आला.

सद्य: स्थितीत जवाहर / धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत ज्या विहिरी अपूर्ण स्वरुपात आहेत अशा जवाहर विहिरी, धडक संचन विहिरी, नरेगातून धडक सिंचन योजनेत परत घेण्यात आलेल्या विहिरी व रद्द केल्या केलेल्या पैकी पुन्हा सूरु करावयाच्या विहिरी यांचा समावेश आहे. वाचा

येथे अ.क्र. ७ मध्ये नमूद दिनांक २५.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये या सर्व विहिरी पूर्ण करण्यास दिनांक ३०.०६.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदत वाढविण्याची विनंती शासनास प्राप्त झाल्याने, सदर बाब शासनास विचाराधीन होती. त्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन परिपत्रक

राज्य रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमा अंतर्गत अपूर्ण स्वरुपात असलेल्या जवाहर विहिरी, धडक सिंचन विहिरी, नरेगातून धडक सिंचन योजनेत परत घेण्यात आलेल्या विहिरी व रद्द केलेल्या पैकी पुन्हा सुरू करावयाच्या धडक सिंचन विहिरी दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१. **सदर विहिरी पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांनी संबधितांना सूचना द्याव्यात.**
२. **जिल्हाधिकारी यांनी या कार्यक्रमाअंतर्गत ज्या लाभार्थ्यांना विहिरी घ्यावयाच्या नाहीत / पूर्ण होण्यासारख्या नाहीत अशा लाभार्थ्यांकडून त्याप्रमाणे लेखी निवेदन घेवून अथवा पंचनामा करुन सदर विहिरी रद्द कराव्यात. तसेच, यापुढे भविष्यात या कार्यक्रमास मुदतवाढ देण्यात येणार नाही.**

सबब सदर विहीरी कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३० जून,२०१८ पर्यंत पूर्ण होणे बंधनकारक राहील. जवाहर/धडक सिंचन विहीर योजनेतील उपरोक्त विहीरी पूर्ण करण्या संदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रक यामधील अटी / शर्ती लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१७१११३१२२२४५२५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2017.11.14 15:18:24 +05'30'

(एकनाथ डवले)
सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मंबई - ३२.
३) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
४) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.

७) विभागीय आयुक्त, अमरावती/नागपूर.

८) जिल्हाधिकारी अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

९) उपजिल्हाधिकारी (रोहयो) अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

११) कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परीषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

१२) मा. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१३) उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) सहाय्यक संचालक (लेखा), रोहयो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)/ निवड नस्ती रोहयो-५